जा.क्र./नसका/स्थायी/सिआर- 16/2020
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 05.02.2020

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**
**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण-2 मधील नियम क्र. 3 (अ) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचि ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र.3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा दिनांक 07.02.20120 रोजी दुपारी 04.00 वाजता नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( तेहरा अमितसिंह गोपालसिंह )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.

**प्रति,**
**श्री / श्रीमती ------------------------------------------**
**सदस्य / सदस्या, स्थायी समिती,**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**विषय क्रं. 01**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या विविध इमारतीतील विधुत व्यवस्थेचे दैनंदिन देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी खाजगी कंत्राटदाराची नेमणुक करणेसाठी ONLINE निविदा मागविण्यात आले असता दिलेल्या मुदतीत एकूण 02 निविदा प्राप्त झाले असुन प्राप्त निविदा मनपाकेच्या निविदा समिती समोर उघडण्यात आले असुन प्राप्त दरांचे तुलनात्मक तक्त्यानुसार या कामासाठी सवारत कमी दराची निविदा मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची अंुदाजपत्रक दरापेक्षा 9.99% कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. त्यामुळे तयांनी सादर केलेली निविदा कमी दराची असल्यामुळे या बाबत सविस्तर विवरण सादर करणेसाठी कळविण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणे लेखी विवरण सादर केले आहे.

01 सदरील कामामध्ये मनपाकेला वेळोवेळी लागणा-या तात्पुरती स्वरुपात लागणारे विधुत व्यवस्था जसे जनरेटर लावणे, हॅलोजन व इतर फोक्स लावणे, ध्वनीक्षेपण व्यवस्था, मिनीचर लाईटींग व्यवस्था Oscillating पंखे, Pedestal पंखे, इत्यादी सर्व विधुत साहित्य त्यांच्याकडे उपलब्ध आहेत त्यामुळे त्यांना सदरील साहित्य स्थानिक बाजारातुन भाडयाने घेण्याची आवश्यक्ता नाही.

02 सदरील कामासाठी लागणारे Tools and ewquipment, ladder and vehicles व कुशल कर्मचारी वर्ग त्यांच्याकडे उपलब्ध आहे व सद्या विविध ठिकाणी चालु असलेल्या कामासाठी सर्व यंत्रणा अद्यावत कार्यरत आहे.

03 त्यांच्याकडे नामांकित विधुत कंपनीचे Dealership आहे त्यामुहे त्यांना Direct कंपनीकडूनच Dealership etc. नेच विधुत साहित्य उपलब्ध होतात.

04 सदरील काम दोन वर्षासाठीचे असल्याने अंदाजपत्रक दरापेक्षा 9.99% कमी दराची निविदा त्यांना परवडते.

वरील प्रमाणे सर्व बाबींचा विचार करुन निविदेतील अटी व शर्तीनुसार या कामासाठी मे. रचना इलेक्ट्रीकल्स परभणी यांची अंदाजपत्रक दरापेक्षा 9.99% कमी दराची रुपये 85,33,410/- ची निविदा पुढील दोन वर्षाकरिता मंजुरीस्तव सादर.

**विषय क्रं. 02**

**विषय** :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रकारच्या वाहनांची देखभाल दुरुसती तसेच सुटेभाग पुरवठा करण्यासाठी एजन्सीची नेमणुक करुन दरपत्रकास मान्यता देणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व वाहनांच्या सर्व प्रकारच्या देखभाल दुरुस्ती व सुटेभाग पुरवठा करणे संबंधीत कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/यां.वपरि/9329/19 दिनांक 18.11.19 अन्वये सालसन 2019-20 साठी प्रशासकिय व आर्थीक मंजुरी दिल्यानुसार जाहिर निविदा क्रं. नावाशमनपा/यां.वपरि/9340/19 दिनांक 18.11.19 अन्वये दैनिक पुण्यनगरी व श्रमिक एकजुट या वर्तमान पत्रातुन निविदा प्रकाशीत करण्यात आली ई-टेंडर क्रं 510535-1 अन्वये (1) पवार मोटर्स नांदेड व (2) मे. व्यंकटेश मोटार्स धनेगांव नांदेड या दोन निविदा प्राप्त झाल्या. पैकी सर्वात कमी दराची निविदा मे. व्यंकटेश मोटार्स धनेगांव

नांदेड यांची असल्याने पत्र क्रं. नावाशमनपा/यां.वपरि/10298/19 दिनांक 09.12.2019 अन्वये वाटाघाटी अंती त्रिसदस्यीय समितीने दर निश्चित केलेले आहेत शिवाय ज्या बाबी निविदेत समाविष्ठ नाहीत अशा सर्व बाबींचे दर विभागाने रितसर प्राप्त केलेले सिलबंद दर पत्रके घेऊन ज्या दरपत्रकाचे दर कमी आहेत त्यानुसार उक्त एजन्सी काम करुन देईल.

करिता मे. व्यंकटेश मोटार्स नांदेड यांचे वाटाघाटी अंती दर मंजुर करण्यात आलेले असुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सर्व वाहनांच्या सर्व प्रकारच्या देखभाल दुरुसती व साहित्य पुरवठा करणेसाठी सालसन 2019-20, सालसन 2020-21 व सालसन 2021-22 या तीन वर्षासाठी मे. व्यंकटेश मोटार्स धनेगांव नांदेड या एजन्सीची नेमणुक करण्या बाबत व तसेच अधिकृत डिलरकडून करुन घेण्यात येणारी सर्व कामे व प्राईलिस्ट नुसार खरेदी करण्यास मान्यता देण्या संबंधीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर मंजुरीसाठी सादर. **(सोबत सर्व प्रकारच्या वाहनांची सर्व प्रकारची देखभाल दुरुस्ती व सुटेभाग करणे बाबतची दरसुची जोडण्यात आली आहे)**

**विषय क्रं. 03** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवरील आकृतीबंध व सेवाप्रवेश प्रस्तावा बाबत सालसन 2018 पासुन ते आज पावेतो वेळोवेळी महापालिकास्तरावर केलेली कार्यवाही व शासन स्तरावर सदर प्रस्तावा बाबत केलेल्या पाठपुराव्या बाबत सविस्तर माहिती घेऊन चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.

**सुचक** :- सौ. अपर्णा नेरलकर **अनुमोदक** :- दयानंद वाघमारे

**विषय क्रं. 04** **प्रस्ताव**

मनपा मालमत्ता कर, पाणी कर, मनपा मालकीच्या व्यापारी संकुलाचा भाडे व इतर करांबाबत वसुलीचा सविस्तर आढावा घेणेसाठीचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सुचक** :- फारुख बदवेल **अनुमोदक** :- वाघमारे दयानंद

**विषय क्रं. 05** **प्रस्ताव**

मनपा आस्थापनेवर लाड, पागे अंतर्गत नियुक्ती दिलेल्या नऊ कर्मचा-यांच्या बाबत शासनाकडे तक्रार करण्यात आलेली असुन त्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने मनपाकडे कांही पत्रव्यवहार झालेला आहे अशी माहिती आहे.

सदर प्रकरणात नऊ कर्मचा-यांपैकी कांही कर्मचा-यांना हे अनुकंपातुन नियुक्ती दिली आहे या बाबत सद्यस्थिती स्थायी समितीला लेखी स्वरुपात अहवाल सादर करण्यात यावा.

**सुचक** :- यन्नम राजेश **अनुमोदक** :- शबाना बेगम मो. नासेर

**विषय क्रं. 06** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी वर्ग-3 व वर्ग-4 ची पदानिहाय मंजुर पदे किती आहे मंजुर पदापैकी कार्यरत किती व रिक्त किती आहे याची पदनिहाय माहिती लेखी स्वरुपात स्थायी समिती सभेसमोर सादर करण्यास मान्यता देण्यात येते.

**सुचक** :- नेरलकर अपर्णा **अनुमोदक** :- शबाना बेगम मो. नासेर

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**( तेहरा अमितसिंह गोपालसिंह )**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.